# ध्रुवच्या चौघांची राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

## मुला-मुलींच्या संघातून प्रत्येकी दोघांचा समावेश





**संगमनेर (प्रतिनिधी)**– सीबीएसईच्या दक्षिण विभागीय शालेय क्रिकेट स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या क्रिकेटपटूंनी सुंदर खेळाचे प्रदर्शन करताना निवड समितीची मनं जिंकली. या स्पर्धेत वैयक्तिक पातळीवर उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या भूषण राऊत, श्लोक हेडा, तनुश्री लहामगे व मानसी आहेर या चौघांनी सुवर्णपदकासह राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत स्थान मिळवले. या संपूर्ण स्पर्धेत ध्रुवच्या क्रिकेटपटूंनी चार सुवर्णपदकांसह बारा रौप्य आणि तीन कांस्य अशा १९ पदकांची कमाई केली.

प्रीतीसुधाजी इंटरनॅशनल स्कूलच्या क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलांच्या गटात भूषण राऊत आणि श्लोक हेडा यांनी तर, मुलींच्या गटात तनुश्री लहामगे आणि मानसी आहेर अशा चौघांनी सुवर्णपदके पटकावली. चौदा वर्षांखालील मुलांच्या गटात तनीष बलदेवा आणि निकुंज सोनी यांनी कांस्यपदक मिळवले. १७ वर्षांखालील गटात तेज जैनला रौप्य आणि साहिल खाडेला कांस्यपदक मिळाले. एकोणावीस वर्षांखालील गटात राऊत-हेडा यांच्या पाठोपाठ सर्वेश बंगाळ, विनीत भन्साळी, साहील शिरसाठ आणि ध्रुव धादवड यांनी रौप्यपदकं पटकावली.

मुलींच्या सतरा वर्षांखालील गटात श्रावणी झिंजुर्डे, प्राप्ती मुरक्या आणि श्रद्धा साठे या तिघींनी रौप्यपदकांची कमाई केली. तनुश्री व मानसी या जोडीच्या सुवर्ण कामगिरीने मनोधैर्य उंचावलेल्या १९ वर्षांखालील गटात आराध्या पुजारी, आराध्या मुळे, पलक सिकची आणि मृण्मयी महाडिक यांनी रौप्यपदकं मिळवली. संपूर्ण स्पर्धेत उत्तम कामगिरी करताना ध्रुव ग्लोबल स्कूलच्या क्रिकेटपटूंनी आपल्या वैयक्तिक कामगिरीच्या बळावर चार सुवर्ण, बारा रौप्य आणि तीन कांस्य अशा १९ पदकांची कमाई केली. सुवर्णपदक विजेत्या चौघांची राष्ट्रीय पातळीवरील क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंना महेश जंगम यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, उपाध्यक्ष गिरीश मालपाणी, प्राचार्या अर्चना घोरपडे व क्रीडा विभागप्रमुख गिरीश टोकसे यांनी अभिनंदन केले आहे.

# शिर्डीतील हॉटेल क्रांती येथे सुरु असणाऱ्या वेश्या व्यवसायावर छापा

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– शिर्डी शहरातील हॉटेल क्रांती या हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती काल मिळाली होती. त्यानुसार श्रीरामपूर अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी येथील वाचक पोलीस उपनिरीक्षक खोंडे यांना सदर प्रकरणी पडताळणी करून सत्यता असल्यास पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत आदेशित केले होते.

त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक खोंडे यांनी बोगस ग्राहक पाठवून वेश्या व्यवसायासंबंधाने खात्री केली असता सदर हॉटेलमध्ये वेश्या व्यवसाय सुरु असल्याबाबतची खात्री पटली. त्या अनुषंगाने सविस्तर पंचनामा करण्यात आला. सदर हॉटेलमध्ये दोन पिडित महिला मिळून आल्या असून सदर पीडित महिलांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना निवारागृहात पाठवण्यात आले आहे. वेश्या व्यवसायावर उपजीविका करणारे हॉटेल चालक व मालक यांच्या विरुद्ध शिर्डी पोलीस स्टेशन या ठिकाणी अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम कलम ३,४,५,७,८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. घटनास्थळावरून सुमारे ३२ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास शिर्डी पोलीस स्टेशन या ठिकाणी पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे हे करत आहे.

# कोतूळ सेवा सोसायटीत साठ लाखांचा अपहार

## तीन कर्मचाऱ्यांचा प्रताप; २७ लाख केले वसूल

**अकोले (प्रतिनिधी)**– तालुक्यातील कोतूळ येथील आदिवासी विविध कार्यकारी सेवा सोसायटीत ६० लाखांचा अपहार झाल्याची तक्रार सेवा सोसायटीचे संचालक व सभासदांनी केली. तसे निवेदन सहायक निबंधक अकोले, सहकार आयुक्त, सहकार मंत्री यांना दिले आहे. तीन कर्मचाऱ्यांनी हा प्रताप केला असून, त्यांच्याकडून २७ लाख रुपये वसूल करण्यात आले आहे.

सोसायटीचे २०२४-२५ चे वैधानिक लेखापरीक्षण करण्यात आले. त्यात संस्थेतील कर्मचारी दादाभाऊ रामभाऊ साबळे (सचिव), दीपक शरद परशुरामी (लिपीक) व रोहिदास लक्ष्मण जगताप (लिपीक) यांच्याकडे हातावर ३९ लाख ८५ हजार रुपये आढळून आले. सदर संस्थांचे वैधानिक लेखापरीक्षण अहवालात ही बाब नमूद करण्यात आली आहे. सदर लेखा परीक्षक यांनी सहायक निबंधक सहकारी संस्था अकोले यांना कळविले. या पत्रात सदर तीनही व्यक्तींना ३१ ऑगस्टपर्यंत सदर रक्कम भरण्याची सूचना करण्यात आली. त्यानुसार सचिव साबळे व दीपक परशुरामी यांनी प्रत्येकी १३ लाख रुपये असा २६ लाखांचा भरणा केला आहे. तर रोहिदास जगताप यांनी १ लाख दहा हजार भरले आहेत. उर्वरित ११ लाख ९० हजार त्यांच्याकडे बाकी आहे. मात्र ही रक्कम या लोकांनी अनेक वर्षे हातावर वापरली असल्याने त्या रकमेचे व्याज धरून ६० लाख रुपये होतात असे तक्रारीत म्हटले आहे.

सदर तक्रार अर्जावर सयाजी मुरलीधर देशमुख, चंदू नाना पवार, भाऊसाहेब प्रभाकर देशमुख, रमेश सोपान देशमुख, सुरेश नानासाहेब देशमुख यांच्यासह दीडशे सभासदांच्या सह्या आहेत.

- कोतूळ सेवा सोसायटीत सुमारे चाळीस लाखांची अफरातफर झाल्याची तक्रार आली आहे. या संस्थेचे मागील व्यवहार तपासणी करून दोषींवर कारवाई होईल.
  **–अमोल वाघमारे** (सहाय्यक निबंधक-सहकारी संस्था अकोले)

- वैधानिक लेखा परीक्षण अहवालात ही बाब समोर आली. तातडीने संबंधित कर्मचारी यांना रकमेचा भरणा करण्याची सूचना केल्या. त्यापैकी २७ लाख १० हजार भरले आहे. ११ लाख ९० हजार वसूल करण्याचे काम सुरू आहे.
  **–मनोज देशमुख** (संचालक-सोसायटी)

# मराठा आरक्षणाचा नवा जीआर जटील न्यायालयात आरक्षण टिकण्याबाबत प्रवीण गायकवाड यांची साशंकता

**पुणे (प्रतिनिधी)**– महागडे शिक्षण आणि बेरोजगारीच्या वाढत्या समस्येमुळे राज्यात आरक्षणाची मागणी वाढत चालली आहे. आरक्षणामुळे जातीजातींमध्ये तीव्र संघर्ष निर्माण होत असून, द्वेषाची भावना निर्माण होत आहे. आरक्षणाच्या बाबतीत सरकारचा हेतू शुद्ध नाही. मराठा आरक्षणाचा नवा जीआर अवघड आणि जटील स्वरूपाचा असल्याने तो न्यायालयात टिकेल का? त्याचा मराठ्यांना लाभ मिळेल का? हे पहावे लागेल, असे मत संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी गुरुवारी येथे व्यक्त केले.

संभाजी ब्रिगेड पुणे शहर व जिल्हा यांच्या वतीने येत्या रविवार (दि. १४) रोजी बालगंधर्व रंगमंदिर येथे महाराष्ट्र धर्माच्या रक्षणासाठी सामाजिक प्रबोधनावर आधारित 'महाराष्ट्र धर्मासाठी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मराठा आरक्षणावर प्रवीण गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, सध्या शिक्षण प्रचंड महाग झाले आहे. शैक्षणिक शुल्क सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. दुसऱ्या बाजूला बेरोजगारीतही मोठी वाढ झाली आहे. आरक्षणाकडे पर्याय म्हणून पाहिले जात आहे. यातून आज वेगवेगळ्या जात समूहांमध्ये संघर्ष उत्पन्न झालेला दिसतो. सरकारही त्याला अप्रत्यक्ष खतपाणी घालताना दिसते. मराठा आरक्षणाचा जीआर काढला खरा. पण, हा जीआर संदिग्ध आहे. त्यामुळे हे आरक्षण टिकेल का, हादेखील एक प्रश्न आहे.

गायकवाड म्हणाले, की केंद्र आणि राज्य सरकारने अर्थसंकल्पात शिक्षणावर अत्यंत कमी निधीची तरतूद केली. सरकारी शिक्षण आणि खासगी शिक्षणातील प्रचंड तफावत असल्याने आरक्षणाचा पर्याय नागरिक शोधत आहे.

# मुख्यमंत्र्यांचा मित्र पक्षांच्या पालकमंत्र्यांना लगाम

## सह पालकमंत्र्यांची जबाबदारी निश्चित

**मुंबई (प्रतिनिधी)**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील तीन जिल्ह्यांसाठी नेमलेल्या सह पालकमंत्र्यांवरील जबाबदारी निश्चित केली आहे. संबंधित जिल्ह्यातील जनतेच्या तक्रारींचा निपटारा करण्याची कामगिरी सह पालकमंत्र्यांवर सोपवून फडणवीस यांनी मित्र पक्षांच्या पालकमंत्र्यांना लगाम घातल्याची चर्चा आहे. या निर्णयाने मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशीष शेलार यांचे पंख कापण्यात आल्याचे बोलले जात आहे.

फडणवीस यांनी मुंबई उपनगर, कोल्हापूर आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांसाठी सह पालकमंत्री नेमले आहेत. राज्यात सह पालकमंत्री नेमण्याची प्रथा २०१४ पासून सुरु झाली. जानेवारी महिन्यात मुंबई उपनगर जिल्ह्यासाठी मंगल प्रभात लोढा आणि कोल्हापूर जिल्ह्यासाठी माधुरी मिसाळ यांना सह पालकमंत्री नेमण्यात आले होते. अलीकडच्या काळात वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांना बुलढाणा जिल्ह्याचे सह पालकमंत्री करण्यात आहे. मात्र, या सह पालकमंत्र्यांची विवक्षित जबाबदारी निश्चित झाली नव्हती. त्यामुळे सरकार दरबारी सह पालकमंत्र्यांच्या कामाबाबत स्पष्टता नव्हती. त्यामुळे तब्बल आठ महिन्यानंतर सरकारने सह पालकमंत्र्यांची जबाबदारी स्पष्ट केली आहे. सामान्य प्रशासन विभागाने बुधवारी याबाबतचा शासन निर्णय जारी केला. मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांनी विवक्षितपणे नेमून दिलेल्या प्रकरणांचा पाठपुरावा करण्याचे काम सह पालकमंत्र्यांवर सोपविण्यात आले आहे. या निर्णयाने मुंबई उपनगर शहर जिल्ह्याचे सह पालकमंत्री असलेले मंगल प्रभात लोढा यांची जबाबदारी निश्चित झाली आहे. लोढा यांना जबाबदारी देऊन महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मुंबई भाजपचे अध्यक्षपद गमावलेल्या आशीष शेलार यांना मुख्यमंत्र्यांनी शह दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

## पान १ वरुन

### मुंबई उच्च न्यायालयात दोन...

कुणबी प्रमाणपत्र देण्यास मान्यता दिली, आणि त्यानुसार जीआर काढण्यात आला या निर्णयाविरोधात आता मुंबई उच्च न्यायालयात दोन जनहित याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. एक याचिका ङ्गशिव अखिल भारतीय वीरशैव युवक संघटनाफ्च्या वतीने, तर दुसरी याचिका वकील विनीत धोत्रे यांनी दाखल केली आहे.

**याचिकांमधील मुख्य मुद्दे व मागण्या**

२ सप्टेंबरची अधिसूचना बेकायदेशीर असल्याचा आरोप या याचिकेतून करण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटियरचा वापर करून कुणबी प्रमाणपत्र देणे म्हणजे घटनात्मक निकषांचे उल्लंघन आहे. त्यामुळे जीआर रद्द करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. याचिकेवरील सुनावणी प्रलंबित असेपर्यंत या जीआरची अंमलबजावणी न करण्याची तसेच त्याद्वारे कोणालाही कुणबी प्रमाणपत्र देऊ नये, अशी अंतरिम मागणी देखील याचिकेत करण्यात आली आहे. या याचिकांवर लवकरच मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होण्याची शक्यता आहे. या याचिकेंवरील सुनावणीत नेमकं काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### मराठ्यांना १० टक्के आरक्षण...

पार्श्वभूमीवर आज ओबीसी नेते छगन भुजबळ यांची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी मोठा दावा केला आहे.

भुजबळ यांनी दावा केला की, मराठा समाज मागास नाही असं सुप्रीम कोर्टानं म्हटलं आहे. प्रतिज्ञापत्रावरून मराठ्यांना ओबीसीत टाकता येत नाही. जाणूनबुजून खोटे प्रमाणपत्र दिले जात आहेत, जरांगेंनी पात्र शब्द काढायला लावला, दुसऱ्या जीआरमधून शब्द काढला. जरांगे म्हणाले मी स्वत: जीआर करून घेतला आहे, असं यावेळी भुजबळ यांनी म्हटलं आहे.

हा जीआर मंत्रिमंडळासमोर न ठेवता, हरकती व सूचना न मागवता, शिवाय इतर मागासवर्गीय समाजाच्या विरोधाकडे दूर्लक्ष करून हा जीआर काढण्यात आला आहे. सध्या स्थितीमध्ये ओबसीमध्ये साडतीनशे पेक्षा अधिक जातींचा समावेश आहे, त्यामुळे त्यांच्या हक्कांवर गदा येऊ शकते. या जीआरमध्ये मराठा समाज असा शब्द प्रयोग करण्यात आला आहे, प्रत्यक्षात मराठा समाज आणि कुणबी या दोन भिन्न जाती आहेत, हे महाराष्ट्र शासनाने देखील मान्य केलं आहे. कुणबींना ओबीसीमधून आरक्षण तर मराठा समाजाला आर्थिक आणि शैक्षणिक आरक्षण असं ठरवण्यात आल्याचा दावा भुजबळ यांनी केला आहे.

राज्य सरकारने हा जीआर तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी भुजबळ यांनी केली असून, अन्यथा राज्यात अराजकता माजेल, असा इशाराही दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभ्यासू वृत्तीचा आदर करतो, पण सरकारने काढलेल्या या जीआरमुळे आम्हाला अनेक अडचणी येतील, असे अभ्यासक लोकांचे मत असल्याचं भुजबळ यांनी सांगितले.

**जरांगेशाही नाही तर लोकशाही**

मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका करताना भुजबळ म्हणाले, या देशात लोकशाही आहे, मजरांगेशाहीफ येण्याची सुतमात्र शक्यता नाही. तसेच, जरांगे यांनी १७ सप्टेंबरची दिलेली मडेडलाईनफ चुकीची असून, या निर्णयाच्या विरोधात ओबीसी समाजही रस्त्यावर उतरू शकतो, असे त्यांनी म्हटले.

### ओबीसींच्या जीआरलाही...

मराठ्यांनी ओळखलं आहे, असं मनोज जरांगे म्हणाले.

ओबीसी यादीचा ८३ क्रमांक सांगतो की, मराठा आणि कुणबी एकच पोटजात-उपजात आहे. मग आता ह्यांनाही सिद्ध करावं लागेल की, १९६७ ला फक्त १८० जाती होत्या. मग तुमच्या बाकी जाती कशा गेल्या? पोटजात-उपजात म्हणूनच ना? आमचाही कुणबी आणि मराठ्यांचा एकच व्यवसाय आहे. आमचेही आरक्षणाचे निकष पूर्ण होत आहेत. आता सगळ्यांना सारखंच सामोरं जावं लागणार आहे. तुम्ही आमचं वाटोळं करायला गेलात तुम्हाला आतापर्यंत कुणी विरोध केला नाही. का? तुम्ही विरोध करत आहात. तर आम्हालाही करावं लागेल, असं जरांगे म्हणाले.

तुम्हाला न्यायालयात कधी उत्तरे द्यावी लागली नाहीत. सरकारला कधी उत्तरे द्यावी लागली नाहीत. पण आता न्यायालयही विचारणार की, १९६७ ला ओबीसीत १८० जाती होत्या, मग आता एवढ्या कशा झाल्या? न्यायमंदिर आता उचलणार आणि सरकार सुद्धा विचारणार की, तुम्हाला मंडल आयोगाने १७ टक्के आरक्षण दिलं होतं, मग आता ३० टक्के आरक्षण कसं काय? एक जात गेली, मग नंतर जाती-पोटजाती कशा गेल्या? मग आमचीदेखील पोटजात आहे. आमचा व्यवसाय एक आहे. आतापर्यंत कुणी विचारत नव्हते. कारण कुणी आडवं जात नव्हतं, असं म्हणत मनोज जरांगे यांनी कोर्टात कसा युक्तिवाद करणार याबाबत सूचक वक्तव्य केलं.

पंकजा मुंडे यांच्या कथित वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना जरांगे म्हणाले, मी पंकजा मुंडे काय बोलल्या, ते ऐकले नाही, पण मला वाटत नाही की त्या असं बोलतील. जर त्या असं बोलल्याच असतील तर मराठ्यांनी सावध होणे गरजेचे आहे. ते पुढे म्हणाले, मराठ्यांच्या मतांवर ज्यांचे राजकीय करिअर मोठे झाले, तेच नेते जर कुणबी प्रमाणपत्र निघाले असूनही घाव घालत असतील तर हे योग्य नाही. यावेळी त्यांनी मराठवाड्यातील आणि बीड जिल्ह्यातील मराठा नेत्यांना जातीचा विचार करून एकजुटीने काम करण्याचा सल्ला दिला. आपले खरे आरक्षण असून हे जर बोगस म्हणणारे असतील तर हे १६ टक्के बोगस आरक्षण खात आहेत, त्याविषयी सुद्धा आपल्याला आवाज उठवावा लागेल, असेही ते म्हणाले.

### लाडकी बहीण योजना...

काही तथ्ये मांडल्याचा दावा केला आहे.

सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी योजनेविरोधात दाखल केलेली जनहित याचिका प्रलंबित आहे. शासनाच्या या अनाठायी खर्चामुळे पायाभूत सुविधा, प्रकल्प रखडले आहेत. सामाजिक कल्याणाचे उपक्रम कोलमडले आहेत. सरकारवर आठ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज असूनही राज्याने थेट रोख हस्तांतरण आणि राजकीयदृष्ट्या प्रेरित खर्चासाठी निधी वाटप करणे सुरूच ठेवले असल्याचे या शपथपत्रात याचिकाकर्त्याने नमूद केले आहे. या प्रकरणावर गुरुवारी न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. यावेळी राज्य सरकारने बुधवारीच नवे शपथपत्र सादर केल्याची माहिती देण्यात आली. प्रत्युरात याचिकाकर्त्यानेसुद्धा काल नवे शपथपत्र दाखल केले.

**याचिकेतील दावा चुकीचा**

महाराष्ट्र वित्तीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियमांनुसार वित्तीय तूट हे तीन टक्क्यांपेक्षा कमी असायला हवी. महालेखापाल यांच्याकडून अंकेक्षण न झालेल्या बाबींबाबत अलीकडेच प्रसिद्ध करण्यात आलेल्या माहितीनुसार राज्याची २०२४-२५ची वित्तीय तूट ही २.६९ टक्क्यांच्या आसपास असेल. त्यामुळे कायद्यातील तरतुदींचे काटेकोर पालन होते आहे. किंबहुना सर्वाधिक कमी वित्तीय तूट असलेल्या देशातील तीन राज्यांत महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. त्यामुळे कल्याणकारी योजनांमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला फटका बसतो आहे आणि वित्तीय तूट वाढत असल्याचा याचिकाकर्त्याचा दावा चुकीचा आणि असमर्थनीय असल्याचा प्रतिदावा राज्य सरकारने केला आहे. तसेच ही याचिका फेटाळून लावावी आणि याचिकाकर्त्याला दंड ठोठवावा अशीही मागणी राज्य सरकारने केली आहे.

### साखर कारखाने ज्या-त्या वर्षीच्या...

दाखल केलेल्या याचिकेबाबत माहिती दिली. याचिकाकर्त्याने मागील वर्षाच्या साखर उताऱ्यानुसार एफआरपी देण्याबाबतची मागणी केली होती. मात्र, याबाबत न्यायालयाने शासनाला आदेशित केले नसल्याने उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन होणार नाही. सद्यःस्थितीत सहकारी साखर कारखानदारी अडचणीत आली असून, वस्तुस्थिती मांडून राज्य शासनाने ताठर भूमिका घेतल्यास सहकारी साखर कारखान्यांसमोर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होईल, असे माजी मंत्री दिलीप वळसे-पाटील म्हणाले.

अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) राजगोपाल देवरा यांनी एफआरपीप्रमाणे दर निश्चित करताना मागील हंगामातील घटक विचारात घेतले जातात. त्यामुळे मागील हंगामातील साखर उताऱ्यानुसार चालू हंगामासाठी जाहीर केलेल्या एफआरपी दराप्रमाणे रक्कम अदा करणे योग्य होईल, असे सांगितले. 'विस्मा' व साखर संघ प्रतिनिधी यांनी देवरा यांच्या मताला असहमती दर्शवत एफआरपीच्या कायद्यात मागील हंगामाच्या साखर उताऱ्यानुसार एफआरपी दिली पाहिजे, असे कोठेच म्हटलेले नाही. केंद्र शासनाद्वारे एफआरपी ठरवून संबंधित हंगामासाठी परिपत्रक काढतानाही त्यात उल्लेख नसतो, असे स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी साखर उद्योगासमोरील अडचणी लक्षात घेता ज्या वर्षाची एफआरपी त्याच वर्षाचा साखर उतारा धरून पैसे अदा करण्याबाबत अध्यादेश काढण्याबाबत विचार करावा, असे सुचविले. तर दिलीप वळसे-पाटील यांनी अध्यादेशाऐवजी शासन स्तरावरून कळविण्यात यावे, असे सांगितले.

**अशी आहे समिती**

उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार दिलीप वळसे-पाटील, अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, साखर आयुक्त सिद्धाराम सालीमठ, आमदार प्रकाश सोळंके, जयप्रकाश दांडेगावकर, बी. बी. ठोंबरे, संजय खताळ, अजित चौगुले.

### १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण...

बँकांसाठीचा रोडमॅप, त्यांचा आकार, जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठीची रणनीती, एआयचा वापर, गुड गव्हर्नन्स, ग्राहकांना झटपट सेवा याविषयी चर्चा होईल. या बैठकीला ठइख चे डिप्टी गवर्नर स्वामीनाथन जे. आणि कंसल्टिंग फर्म चलघळपीशू चे सदस्य पण उपस्थित असतील.

सूत्रांच्या माहितीनुसार, सरकारी बँकांच्या विलिनीकरणाची चर्चा रंगणार आहे. देशातील १२ सरकारी बँकांचे विलिनीकरण करून केवळ ४ ते ५ मोठ्या सरकारी बँका तयार करण्यात येतील. याच बँका कारभार हाकतील. जागतिकरणाचा हाकारे वाजत असताना बँकिंग क्षेत्रालाही या स्पर्धेत उतरण्यासाठी सरकार दरबारी मोठी तयारी सुरू असल्याचे कळते. २०२० मध्ये सरकारने विलिनीकरणाची मोठी प्रक्रिया राबवली होती. त्यामुळे सरकारी बँकांची संख्या २७ वरून थेट १२ वर आली. आता सरकार अर्थव्यवस्था अधिक गतिमान करण्यासाठी आणि तिसऱ्या क्रमांकावर झेप घेण्यासाठी बँकांच्या विलिनीकरणासाठी आग्रही असल्याचे समोर येत आहे. विकसीत भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हे पाऊल टाकल्याचे समोर येत आहे.

### शिर्डीत एआय मुळे भाविकांची...

भीमराज दराडे, प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, संरक्षण अधिकारी रोहिदास माळी, राहुल गलांडे यांच्यासह कंपनीचे वरिष्ठ अधिकारी अमिताभ रॉय चौधरी तसेच संस्थानचे विविध विभागप्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.

नवीन प्रणालीद्वारे मंदिर परिसरातील प्रमुख प्रवेशद्वारांवरून येणाऱ्या भाविकांची अचूक नोंद होणार आहे. दर्शनानंतर मुखदर्शन आऊट व बुंदी प्रसाद आऊट येथेही भाविकांचे आऊट काउंटिंग करण्यात येणार असून यामुळे दररोज साईबाबांचे दर्शन घेणाऱ्या भाविकांची आकडेवारी संस्थानाकडे उपलब्ध राहील. ही माहिती गर्दी नियंत्रण, सुविधा व्यवस्थापन व नियोजनबद्ध सेवा यासाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रणालीत फेस डिटेक्शन तंत्रज्ञानाचा समावेश असून संशयित अथवा गुन्हेगारांचे फोटो पूर्वनियोजित पद्धतीने डेटाबेसमध्ये अपलोड केले जातील. अशा व्यक्तींची उपस्थिती आढळल्यास सुरक्षा यंत्रणेला तात्काळ सूचना मिळून त्वरित कारवाई करता येईल. यामुळे मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्थेत लक्षणीय बळकटी येणार आहे.

भाविक संख्येच्या अचूक नोंदीमुळे भोजन, निवास व अन्य सुविधा अधिक नियोजनबद्धपणे उपलब्ध करून देता येतील. तसेच गर्दीच्या वेळी गेटनिहाय भाविकांचे विभाजन करून दर्शन प्रक्रियाही अधिक सुकर होणार आहे. सध्या ही प्रणाली नवीन दर्शन रांग येथील कॅमेऱ्यांवर सुरू करण्यात आली असून आगामी काळात पालखी रोडसह पोलीस स्टेशनच्या अखत्यारीतील कॅमेरेही या यंत्रणेशी जोडले जाणार आहेत. ही एआय आधारित पीपल काउंटिंग प्रणाली साईबाबा संस्थानाच्या दर्शन व सुरक्षा व्यवस्थापन क्षेत्रात अतिशय उपयुक्त ठरेल, असा विश्वास संस्थानातर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

### थकबाकीदार शेतकऱ्यांना...

३० जूनअखेरची असून थकबाकीदार शेतकऱ्यांची संख्या लाखोंच्या घरात आहे. तसेच ही आकडेवारी दोन महिने पूर्वीची असून यामुळे थकबाकीदार शेतकरी व त्यांच्या थकीत कर्जाच्या रक्कमेत २० ते २५ टक्के वाढ झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. दरम्यान, अजूनही शेतकऱ्यांनी कर्जमाफीची आशा सोडलेली नाही. तसेच सरकारकडून दरवेळी कर्जमाफीची आशा दाखवण्यात येत असल्याने त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या कर्जपरत फेडीवर होत असल्याचे बँकांच्या सुत्रांचे म्हणणे आहे.

दरम्यान, नगरसह राज्यातील १९ जिल्ह्यांमधील अर्धा ते दीड लाखांपर्यंत शेतकरी बँकांचे थकबाकीदार असल्याची बाब राज्यस्तरीय बँकर्स कमिटीच्या अहवालातून समोर आली आहे. राज्य सरकार अडचणीतील शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करेल, या आशेने शेतकरी थकबाकी भरायला बँकांकडे फिरकत नसल्याने बँकांनी आता शेतकऱ्यांना वसुलीच्या नोटिसा पाठवण्यास सुरू महायुती सत्तेत आल्यावर बळीराजाचा सातबारा कोरा करू, अशी ग्वाही विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारसभेत दिली होती. त्यानंतर शिवसेनेसह काँग्रेस नेत्यांनीही जाहीरनाम्यात ते वचन दिले होते. नैसर्गिक आपत्तीने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफीची आशा होती आणि त्यामुळे त्यांनी बँकांकडून घेतलेले पीककर्ज व मुदत कर्ज भरलेच नाही. दुसरीकडे नियमित कर्ज फेडणारे शेतकरी देखील आता थकबाकीत जात आहेत. बँकेचे कर्ज थकल्यावर पुन्हा त्यांना नव्याने कर्ज मिळत नाही. बँकांनी शेतकऱ्यांना कर्ज देताना सिबिल स्कोअर पाहू नये, असे राज्य सरकारचे निर्देश आहेत. मात्र, बँकांमध्ये त्याचे पालन होत नसल्याची वस्तुस्थिती आहे.

दरम्यान, जिल्ह्यात राष्ट्रीयकृत बँकांसह अन्य बँकांनी जे शेतकऱ्यांचे कर्ज एनपीमध्ये (थकबाकीत) गेले आहेत. त्यांना कर्जाच्या वसूलीसाठी थेट जिल्हा अथवा तालुका न्याय प्राधिकरण (कोर्ट) यांच्या मार्फत वसूलीच्या नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. संबंधीत शेतकऱ्यांचे कर्जाच्या वसूलीचे प्रकरण आता न्यायालयात जाणार असल्याने शेतकऱ्यांना तडजोड करून कर्जाची थकबाकी भरावी लागणार आहे. एककीकडे कर्जमाफीच्या आशेवर असणाऱ्या शेतकऱ्यांना हा जबर धक्का मानला जात आहे.

**१९ जिल्ह्यात वसुलीचा प्रश्न**

राज्यस्तरीय बँकर्स कमिटीच्या रिपोर्टनुसार राज्यातील अहिल्यानगर, बीड, नाशिक, सोलापूर, अमरावती, बुलडाणा, धुळे, हिंगोली, जळगाव, जालना, नागपूर, नांदेड, धाराशिव, अकोला, छत्रपती संभाजीनगर, परभणी, पुणे, वर्धा व यवतमाळ या जिल्ह्यांमधील किमान ५० हजार ते दीड लाख शेतकरी सध्या थकबाकीत आहेत. कर्जमाफीच्या आशेवरील २१ लाख शेतकऱ्यांसाठी बँकांचे दरवाजे बंद झाले आहेत. त्यामुळे खासगी सावकारांकडून जादा व्याजदराने व शेती, जागा, घर गहाण ठेवून कर्ज घेणार्यांची संख्या वाढू लागली आहे.

**काही ठिकाणी तोंड पाहून कारवाई**

जिल्ह्यात अनेक गावात शेतकऱ्यांची तोंडे पाहून काही बँकांकडून कर्जाच्या थकबाकीदारांना नोटीस काढण्यात येत असल्याचा आरोप होत आहे. प्रत्येक गावात असणाऱ्या थकबाकीदारांना बँकांना नोटीसा बजावल्या का? की केवळ कोणाच्या सांगण्यावरून नोटीसा बजावण्यात आल्या, याची चौकशी होवून सर्व थकबाकीदारांना राष्ट्रीयकृत बँकांनी सरकट नोटीस बजावण्याची मागणी होत आहे.